




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड






www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ८ सप्टेंबर २०२२ | वर्ष : २० वे | अंक : ३४० वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# स्वत:च्या कारखान्यावर ऋण काढून साजरा केला 'विठ्ठल'चा सण

## सभासदांनी निवडलेले नेतृत्व, अभिजित पाटलांचे दातृत्व

सुराज्य/पंढरपूर

**'ऋण काढून सण साजरा करणे' ही एक ग्रामीण भागातील म्हण आहे. अर्थात ही म्हण स्वत:चे चैन भागवणाऱ्यांसाठी वापरली जाते. मात्र या म्हणीचा अर्थ बदलून टाकणारी कृती विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी केली आहे. त्यांनी स्वत:च्या दोन खासगी कारखान्यांवर कर्ज काढले असून त्या कर्जाच्या रक्कमेतून विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले देण्यास सुरुवात केली आहे. ७ सप्टेंबरपासून पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.**




विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने २०-२१ मध्ये गाळप केलेल्या उसाचे ३० कोटी रुपयांचे बिल तत्कालीन अध्यक्ष भगीरथ भालके यांनी दिले नव्हते. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची कोंडी झाली होती. हाच मुद्दा 'विठ्ठल'च्या निवडणुकीत कळीचा बनला होता. त्या पार्श्वभूमीवर मागील दोन महिन्यापूर्वी झालेली विठ्ठल' कारखान्याची निवडणूक अभिजित पाटील यांनी एकतर्फी जिंकली होती. निवडणूक काळात थकलेले ऊसबिल व कारखाना बंद असल्याचा मुद्दा गाजला होता.

अभिजित पाटील यांनी प्रचारात सभासदांनी कारखाना जर आपल्या ताब्यात दिला तर थकलेले ऊसबिल देऊनच नवीन हंगाम सुरू करण्याची ग्वाही दिली होती.

याची पूर्तता आता त्यांनी केली आहे. यासाठी त्यांनी आपल्या दोन खासगी साखर कारखान्यांवर कर्ज घेऊन ३० कोटी रुपयांची रक्कम उभा केली आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, विष्णू बागल, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील, रयत क्रांतीचे नेते दीपक भोसले, सचिन अटकळे, संचालक दिनकर चव्हाण यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. शेतकऱ्यांचे थकलेले ऊसबिल दिल्याबद्दल शेतकरी संघटनांच्यावतीने याचे स्वागत करण्यात आले.

### ७ सप्टेंबरपासून वाटप सुरू

थकीत ऊसबिलाचे वितरण ७ सप्टेंबरपासून डीव्हीपी मल्टिस्टेटच्या तालुक्यातील शाखांमधून सुरू करण्यात आल्याचे अध्यक्ष पाटील यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत सांगितले. शेतकऱ्यांचे ऊसबिल देऊनच कारखान्याचा गळीत हंगाम सुरू करणार असल्याचे निवडणुकीत जाहीर केले होते. आज तो शब्द पूर्ण केला आहे. आता १ ऑक्टोबर पासून कारखाना सुरू होईल. तत्पूर्वी ७ सप्टेंबरपासूनच थकीत ऊसबिल देण्यास सुरुवात केली आहे. कामगारांचा १४ कोटी रुपये पगार थकला असून २ कोटी रुपये आत्तापर्यंत दिले आहेत. येत्या काळात कामगारांचे उर्वरित वेतनही दिले जाईल, अशी ग्वाही अभिजित पाटील यांनी दिली.

### ॲडव्हान्स परत करण्यासाठी बजावल्या नोटिसा

दरम्यान साखर कारखान्याकडे असलेली १ लाख ९ हजार साखर पोती राज्य बँकेच्या ताब्यात आहेत. याची विक्री बँकेने करावी व यातून येणारी रक्कम कर्जात भरून घ्यावी, असे सांगण्यात आले आहे. विठ्ठल कारखान्यावर राज्य सहकारी शिखर बँकेचे जवळपास ३४० कोटी रुपयांचे कर्ज आहे. यासह अन्य वित्तीय संस्थांचे काही कर्ज आहे. विठ्ठल सेवा संघाच्या माध्यमातून दिलेल्या ॲडव्हान्स परत करण्याबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत. १ ऑक्टोबरपर्यंत जर पैसे भरले नाहीत तर यातील बड्या मंडळींसह सर्वांची नावे जाहीर केली जाणार आहेत, असेही अभिजित पाटील यांनी यावेळी सांगितले.

### दीड वर्षात न जमलेले दीड महिन्यात जुळले

स्व. आमदार भारत भालके यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र भगीरथ भालके यांना विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष केले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली सन २०-२१ चा गाळप हंगाम पार पडला होता. मात्र त्या हंगामातील शेतकऱ्यांच्या उसाची बिले भगीरथ भालके यांनी दिली नव्हती. भगीरथ भालके यांना दीड वर्षात जे जमले नाही ते अभिजित पाटील यांनी दीड महिन्यात करून दाखवले.

## पनाश बांधकाम प्रकरणी ९ सप्टेंबरनंतर पुढील कार्यवाही करणार : आयुक्त

**सोलापूर** : शहरातील विजापूर रोडवरील तब्बल १७ मजली पनाश टॉवर बांधकाम प्रकरणी पुण्यातील गॅलॉर कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, त्यांनी शुक्रवारपर्यंत कागदपत्र जमा करण्याची मुदत मागितली आहे त्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल अशी माहिती आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली .

सोलापूर महापालिका हद्दीत विजापूर रोडवरील तब्बल १७ मजली पनाश टॉवरची भव्य इमारत बांधण्यात आली आहे. पुणे येथील गॅलॉर कंपनीच्या माध्यमातून हा टॉवर साकारण्यात येत आहे. सन २०११ ते २०२१ दरम्यान वेळोवेळी महापालिका प्रशासनाकडून कंपनीने बांधकाम परवानगी घेतली. संभ्रम निर्माण करणारी माहिती संबंधित कंपनीने महापालिकेला देऊन ही परवानगी घेतल्याची शंका उपस्थित केली आहे. अकॉमडेशन रिझर्वेशन आणि युडीपीसीआर या दोन्ही पद्धतींच्या आधारावर वेळोवेळी परवानगी मागितली. अकॉमडेशन रिझर्वेशनप्रमाणे या ठिकाणी नऊ मजली बांधकाम करणे आवश्यक होते मात्र सध्या १७ मजली बांधकाम परवानगी घेतली.



या बांधकाम प्रकरणी महापालिका प्रशासनास चुकीची माहिती देण्यात आल्याचे प्राथमिक दृष्ट्या समजते. याप्रकरणी परवानगी कशी दिली यासंदर्भात तक्रार आल्यानंतर प्राथमिक चौकशी अंती संबंधित कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असल्याचे महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी स्पष्ट केले. यासाठी ९ सप्टेंबर पर्यंत मुदत मागितली आहे त्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल असेही ते म्हणाले.

## हन्नूर येथे चार शेतकऱ्यांचे घर फोडले

**अक्कलकोट** : हन्नूर येथे चार शेतकऱ्यांचे अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्रीत चार घरे फोडून पैसे, सोने, वगैरे असा एकूण ७४ हजारांचा मुद्देमाल लंपास केला. दरम्यान, या घटनेने गावातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.ही घटना बुधवारी ( दि. ७ ) पहाटे च्या सुमारास घडली.

याबाबत अक्कलकोट उत्तर पोलीस व घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी की, तालुक्यातील हन्नूर येथील भुताळसिध्द मंदिर जवळ असलेल्या विठ्ठल विश्वनाथ पारतनाळे यांच्या घरात अज्ञात चोरटे घुसले. त्यांनी सुमारे २८ हजार रोख व ३६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले.त्यानंतर विश्वनाथ शंकर तळवार यांचे रिकामी घर, चांद साहेबलाल शेख यांची रिकामी घर व जानकीबाई ओंकार जडगे याचे बंद घराचे कुलूप तोडून सुमारे १० हजार रुपये रोख असे एकूण ७४ हजारांचा मुद्देमाल चोरांनी चोरून नेला. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी व फुलारी हे करीत आहेत.

## पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर विजय, भारताचं आव्हान संपलं

**दुबई** : रोमांचक सामन्यात पाकिस्तानने अफगाणिस्तानचा एक विकेटनं पराभव केला आहे. पाकिस्तानच्या विजयासह भारताचं आशिया चषकातील आव्हान संपुष्टात आले आहे. श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यामध्ये आशिया चषकाचा अंतिम सामना होणार आहे. श्रीलंका आणि पाकिस्तान संघाने प्रत्येकी दोन दोन सामने जिंकत फायनलचं तिकिट मिळवलं आहे. अफगाणिस्तानचं १३० धावांचं आव्हान पाकिस्ताननं अखेरच्या षटकात एक गडी आणि चार चेंडू राखून पार केलं. वेगवान गोलंदाज नसीम शाहनं दोन खणखणीत षटकार लगावत पाकिस्तानला विजय मिळवून दिला.





## विसर्जनाची सेल्फी 'सुराज्य'च्या अंकात...

Go Green with Ecofriendly Ganesh ही मोहीम घराघरात पोहोचली आणि अवघा गणेशोत्सव इकोफ्रेंडली बनला.

लाडक्या बाप्पाचे विसर्जन सुरु होईल ते अनंत चतुर्दशी पर्यंत!

आपल्या घरातील लाडक्या बाप्पाचे घराच्या दारात, अंगणात, टेरेसवर जेव्हा विसर्जन कराल तेव्हा या क्षणाची 'सेल्फी' घ्यायला विसरु नका!

ही सेल्फी सुराज्यला व्हॉटस्अप किंवा इमेलवर पाठवा!

**सोबत आपले नाव आणि पत्ता आवर्जुन द्या...**

**आपला हा सुंदर आठवणीचा सेल्फी सुराज्यच्या अंकात प्रसिद्ध होईल.**

WhatsApp

8975768353 | 8975768352 | 9011466100 | 8888818448

8975768349 | 7775956817

Email : timemarathi@gmail.com


### मूर्ती संकलनाचे १३ ठिकाणी केंद्र

## पंढरपुरात आपत्कालीन परिस्थितीतीसाठी बोटीची व्यवस्था

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




मलाही त्यांचा फोन आला होता...

| कल्याण |
| --- |
| -------- |

| मेन बाजार |
| --- |
| -------- |

सुराज्य/पंढरपूर

शहरातील घरगुतीसह सार्वजनिक मंडळाच्या मूर्ती गोळा करण्यासाठी पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने शहरात १३ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्राची उभारणी केली आहे. तसेच निर्माल्य गोळा करण्यासाठी फिरत्या वाहनांची व संकलन केंद्रावर व्यवस्था करण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापनतंर्गत चंद्रभागा नदीपात्रात बोटींची व जीवरक्षकांची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी दिली.

विसर्जनासाठी नगरपालिका प्रशासनाच्या वतीने तयारी पूर्ण केली असून, विसर्जन ठिकाणी पुरेसा प्रकाश व्यवस्था, आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात आले आहे. नदीपात्रात होडीतून विसर्जन करताना क्षमतेपेक्षा जास्त व्यक्तींनी बसू नये. लहान मुलांना नदीपात्रापासून दूर ठेवावे. पावसामुळे घाटावरील पायऱ्या निसरड्या होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी दक्षता घेऊन सुरक्षित विसर्जन करावे असे आवाहनही माळी यांनी केले आहे.



### विसर्जनासाठी गणेशमुर्ती याठिकाणी जमा कराव्यात

अर्बन बँक प्रशासकीय इमारतीसमोर, भोसले चौक गणेश मंदिरासमोर, शेटे पेट्रोलपंपा समोर, कॉलेज चौक बस स्टॉप जवळ, ठाकरे चौक, सावरकर चौक गजानन मेडिकल समोर, शिवतीर्थ शिवाजी चौक, महात्मा फुले पुतळ्यासमोर, महाद्वार चौक पोलीस चौकी जवळ, मुक्ताबाई मठा समोर, अंबाबाई पटांगण समोर विठ्ठल मोबाईल शॉपी जवळ, यमाई तलाव गेट जवळ टाकळी रोड, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग जवळ या ठिकाणी घरघुतीसह सार्वजनिक मंडळाच्या मुर्ती गोळा करण्यासाठी संकलन केंद्र उभारण्यात आले आहेत.